Historicity Research Journal
Volume 2 | Issue 1 | Sept 2015 ISSN:- 2393-8900

Research Article

सांस्कृतिक सोलापूर– एक दृष्टिक्षेप

अमिता नागणे

(इतिहास विभाग प्रमुख)
शरदचंद्र पवार कला वाणिज्य शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.

प्रस्तावना :

सोलापूर शहर हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे शहर असून या शहरास ऐतिहासिक व धार्मिक इतिहास आहे. हे शहर मुंबई - मद्रास रेल्वे मार्गावरील महत्त्वाचे व्यापारी केंद्र असून ते महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशाच्या सीमेवर वसले असल्याने येथे मराठी, कानडी आणि तेलगु भाषिक लोक मोठ्या प्रमाणावर राहतात. सोलापूर शहर हे जिल्ह्याचे ठिकाण असून इ. स. १८३८ मध्ये सोलापूर, बार्शी, मोहोळ, करमाळा, इंडी, हिप्परगी व मुध्देबिहाळ इत्यादी विभाग एकत्र करून सोलापूर जिल्ह्याची निर्मिती □रण्यात आली होती. इ. स. १८६९ मध्ये सोलापूर, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, सांगोला आणि पंढरपूर हे विभा□ सोलापूर जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आले होते. इ. स. १९४९ मध्ये अक्कलकोट, मोहोळ, मंगळवेढा या तीन नवीन तालुक्याची निर्मिती □रून ते सोलापूर जिल्ह्यास जोडण्यात आले. इ. स. १९५६ मध्ये महाराष्ट्र राज्याची पुनर्रचना केल्यानंतर सोलापूर जिल्हा द्विभाषिक मुंबई राज्यात समाविष्ट करण्यात आला आणि सन १९६० पासून हा महाराष्ट्राचा महत्त्वाचा भाग बनला.[१]

सोलापूर जिल्हा हा दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जातो. सन १३९६ चा दुर्गादेवीचा दुष्काळ,[२] सन १४६० चा दामाजी पंथाचा[३] दुष□ाळ सोलापूर जिल्ह्यात प्रसिध्द आहेत. सन १८७६ आणि सन १८९६ मध्ये पडलेल्या दुष्काळामुळे सोलापूर जिल्ह्यावर आणि शहराच्या आर्थिक स्थितीवर फारच प्रतिकूल परिणाम झाल्याची नोंद सापडते.[४]

जिल्ह्यातील शेतीला पा□ी पुरवठा व्हावा, यासाठी बार्शी तालुक्यातील कोरेगाव येथे सन १८५५ मध्ये, सोलापूर जवळ एकरूख येथे सन १८७१ मध्ये आणि माढा तालुक्यात आष्टी येथे सन १८८१ मध्ये तलाव खोदले. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यात □ापसाचे उत्पादन वाढण्यास मदत झाली.[५] □ापसाचे उत्पादन वाढल्याने सोलापूर शहरात कापड गिरण्यांची मुहूर्तमेढ रोवली □ली. त्यामध्ये सोलापूर स्पिनिंग ॲण्ड विव्हिंग मिल (जुनी गिरणी) (१८७७), नरसिंग □िरजी मिल[६] (१८९८), लक्ष्मी कॉटन मिल (१८९६),[७] विष्णु कॉटन मिल (१९१०),[८] दि जामश्री रणजितसिंगजी स्पिनिंग ॲण्ड विव्हिंग मिल (१९०९).[९] इत्यादी कापड गिरण्यांचा समावेश होतो. शहरातील कापड गिरण्यातून काम करणाऱ्या कामगारांची संख्या वाढल्याने हे शहर कामगारांचे शहर म्हणून ओळखले जाऊ लागले.

भाषा

सोलापूर शहरात सर्व जाती धर्माचे लोक मराठी भाषा बोलतात, याचे प्रमाण ७१.५% असे आहे. १२.२% लो□ □ानडी बोलतात. कर्नाटकातील कानडी भाषेचा प्रभाव सोलापूर शहरावर पडलेला आहे. कर्नाटकात आई या शब्दासाठी 'अव्वा', वडीलांसाठी 'आप्पा' तर वडील बंधूसाठी 'आण्णा' आणि बहिणीसाठी 'आक्का' या शब्दांचा वापर केला जातो. सोलापूर शहर व □ामीण भागात वरील शब्दांचा वापर सर्रास होत असतो. लोकांच्या बोलीभाषेवर या शब्दांचा प्रभाव पडल्याचे जाणवते. शहरात असणारे मुस्लिम लोक उर्दूबरोबर मराठी आणि कन्नड भाषेचा वापर आपल्या रोजच्या व्यवहारात करतात. १६.३% लोक उर्दू भाषा बोलतात, शिवाय हिंदी आणि तमीळ बोलणारे लोकही या शहरात दिसून येतात.[१०] आंध्रप्रदेश मधून सोलापूर शहरात आलेल्या लोकांची भाषा तेलगु असल्याने ते तेलगु भाषेलाच प्राधान्य देतात.[११] तेलगु भाषिक लोक अलीकडील काळात महाराष्ट्रीयन संस्कृतीशी समरस झालेले आहेत. रामय्या, नरसय्या, यल्लय्या या नावांच्या ऐवजी अलीकडे विठ्ठल, एकनाथ, पांडुरंग, तुकाराम अशी नांवे तेलगु भाषिक लोकांची पहावयास मिळत आहेत.[१२]

सोलापूर □ाम-नाम

सोलापूर शहराच्या नावाबद्दलची माहिती विविध साधनातून मिळते. काही ताम्रशिलामधून सोलापूरचा उल्लेख सोन्नलिगे, सोन्नलगे असा आढळतो. बाराव्या शतकातील सोन्नलिगे म्हणजेच सोलापूर होय.[१३] श्री सिध्दरामेश्वरांच्या काळात सोन्नलिगे येथे नागप्पा जहागिरदार आणि त्याची पत्नी चामलादेवी राहत होती.[१४] त्यांनीच श्री सिध्दरामेश्वरास गाव वसवि□यासाठी एक कोस प्रदेश दिल्याचा उल्लेख आहे.[१५] □जेगाव, अक्कलकोट, तडवळ, कामती खुर्द व आचेगाव येथे सापडलेल्या शिलालेखात सोन्नलपूरच्या कपिलसिध्द मल्लिकार्जून देवस्थानास दान दिल्याचा उल्लेख आहे.[१६]

पुरातत्त्व उत्खननामध्ये प्राप्त झालेल्या तांब्याच्या वस्तू व वस्तु उद्योगाची प्राचीनता महाराष्ट्रातील सोनारांच्या □ारागिरीवरून दिसून येते. शिलाहार राजा गंडरादित्य याचा शके १०५८ चा कोल्हापूर येथील शिला ले□ामध्ये सोनाराने द्यावयाच्या करास सुवर्ण कर म्हटले आहे. तशाच स्वरूपात सोन्नलिगे नगरचाही उल्लेख यादवराजा महादेव यांच्या शके ११८६ च्या संगुर लेखात आणि जैतूगी यांच्या तिथीरहित जामगांव ताम्रपटात सापडतो.[१७] यावरूनही सोन्नलिगे स्थलनाम सोनारांचे अस्तित्त्व दर्शविणारे वाटते.

सोलापूर या नावाबद्दल इतरही काही साधनातून माहिती उपलब्ध आहे. प्रसिध्द इतिहास संशोधक ग. ह. □रे यांनी १६ □ाडी मिळून सोलापूर हे नांव मिळाले असावे, असे म्हटले आहे.[१८] सोळा गावांचे एकत्रीकरण होऊन 'सोलापूर' हे नांव मिळाले असावे अथवा १६ गावांच्या नावामध्ये अहमदपूर, अदिलपूर, चामलादेव, फत्तेपूर, जामदापूर, काळजापूर,[१९] □ाडरपूर, खंडेरावची वाडी, महम्मदपूर, राणापूर, संदलपूर,[२०] शेकापूर, सोलापूर, स्वन्नलगी, सोनापूर, वैदकीवाडी इत्यादी नांवे असून त्यातील 'सोलापूर' या नावावरून पुढे हेच नांव रूढ झाले असावे असे वाटते.[२१]

देवगिरीच्या यादवांच्या शासन काळात सोलापूर परिसरात वीरशैव सांप्रदायाचे मोठे केंद्र होते. यादव साम्राज्याच्या सोलापूर विभा□ामध्ये सोन्नलि□ येथे वीरशैव पंथाचे थोर संत श्री सिध्देरामेश्वर यांचे मुळठिकाण होते. त्यामुळे सोन्नलिगे या □ामास वीरशैवाचा पवित्र आणि महत्त्वपूर्ण दर्जा प्राप्त झालेला होता. कवी राघवांक यांनी रचलेल्या ' सिध्दराम पुराणामध्ये ' असा उल्लेख आहे की, सिध्दरामेश्वराने सोन्नलिगे येथे तलाव बांधून शिवलिंगाची स्थापना केली. अशा या स्थळाशी इ. स. ११६० मध्ये होऊन गेलेल्या बसव यांच्या बहिणीचा मुलगा चन्नबसव याने वीरशैव पंथाचा सोन्नलिगे या स्थळाशी संबंध जोडले होते.[२२]

'शोळा' म्हणजे सोळा आणि पूर म्हणजे खेडी यावरून शोलापूर, सोलापूर असे नांव प्राप्त झाले.[२३] ज्या सोळा खेड्यापासून सोलापूर शहर बनले त्या सोळा खेड्यात स्वन्नलगी, सोलापूर, सोनापूर या खेड्यांची नांवे सोलापूर शहराच्या नावाशी मिळती जुळती आहेत. स्वन्नलगी म्हणजे 'सुवर्णवल्ली' या शब्दावरून सोलापूर हे सोन्यासारखे सुंदर होते, असा अर्थ प्राप्त होतो. ब्रिटिश राजवटीत सोलापूर या शब्दाचा उच्चार 'शोलापूर' असा केला जात होता. स्वन्नलगीचे स्वन्नलपूर, स्वन्नलपूरचे स्वल्लापूर आणि स्वल्लापूरचे सोलापूर झाले असावे. सन १९७४ मध्ये महाराष्ट्र सरकारने शोलापूर (Sholapur) चे सोलापूर अशी दुरूस्ती □रून 'सोलापूर' हे नाव निश्चित केले.[२४]

सोलापूर शहराची रचना

शहराचे जुने सोलापूर शहर व नगरपालीका स्थापन झाल्यानंतरचे शहर असे दोन भाग पहावयास मिळतात. जुन्या सोलापूर शहराचा विस्तार १५० एकरावर होता. त्यामध्ये कसबा पेठ व शुक्रवार पेठेचा समावेश होता.[२५] श्री सिध्दरामेश्वरास सोलापूरचे जहागिरदार नागप्पाने व त्याच्या पत्नीने मंदिर आणि तलाव बांधणीसाठी तसेच शहराचा विस्तारासाठी दान दिलेल्या जमिनीत आज आपणास किल्ला, सिध्देश्वर मंदिर आणि सिध्देश्वर तलाव पहावयास मिळतो. किल्ल्याच्या जागेत श्री सिध्देश्वरांनी स्थापन □लेले मल्लिकार्जूनाचे देवालय होते.[२६] जुन्या सोलापूर शहराच्या विविध दिशांना एकूण आठ वेशी होत्या. त्यामध्ये देगांव वेश, बाळी वेश, तुळजापूर वेश, दारी वेश, विजापूर वेश, पाणी वेश, रेवणी वेश व □ुंभार वेश इत्यादी वेशींचा समावेश होता. नंतरच्या काळात देगांव वेश, तुळजापूर वेश, कुंभार वेश, दारी वेश आणि विजापूर वेश पाडून कुंभारी वेश ते विजापूर वेशी दरम्यान एक चांगला रस्ता तयार करण्यात आला. शहरातील नगरपालिकेच्या स्थापनेनंतर सन १८६४ मध्ये कलेक्टर गोल्ड फिंच यांनी देगांव वेशीपासून सुमारे २७५ यार्डावर एका नव्या पेठेची स्थापना केली. तेथेच पूर्वी नवी वेश अस्तित्त्वात होती. अशा एकूण ९ वेशी सोलापूर शहरास होत्या.[२७] सोलापूर शहरास अडीच मैल लांबीची दगडी व विटांनी बांधलेली तटबंदी होती. ही तटबंदी ८ ते १० फुट उंच आणि ४ ते ६ फुट रूंद होती.[२८] □ाळात 'जोडभावी पेठ' या नावाने ओळखण्यात येऊ लागले. सन

१८८१ पासून सिध्देश्वर पेठेचा उल्लेख 'शतसांत्सरिक' या ग्रंथात पहावयास मिळतो.[२९] सोलापूर शहराचा विकास होत असताना १६ □ावांपै□ी □ाही □ांवे सोलापूर शहर हद्दीत समाविष्ट झाली नाहीत, त्यामध्ये काजळापूर, संदलपूर, भोगापूर, चामलापूर इत्यादी गावांचा समावेश होतो. सन १६८४ मध्ये औरंगजेब बादशहाने ज्या दोन पेठा निर्माण केल्या होत्या त्या पेठामध्ये[३०] □ाजळापूर, संदलपूर, भोगपूर, चामलापूर ही गांवे समाविष्ट करण्यात आली होती. सन १७६८ मध्ये सोलापूर शहराचे क्षेत्रफळ नव्या पेठेसह २७३ एकर इतके होते.[३१]

सन १८५० चा २६ वा कायदा[३२] सोलापूर शहर व लगतच्या भागास १ ऑगस्ट १८५२ पासून लागू करून शहरात नगरपालिका अस्तित्वात आली.[३३] सन १८६६ मध्ये सोलापूर नगरपालिका शहर हद्दीसंबंधी पहिला जाहिरनामा गॅझेटमध्ये प्रसिध्द केला. त्यानुसार सोलापूर शहराची मोतीबागेपासून ते देगांव नाल्याच्या काठाने व पुढे रेल्वेच्या १४ कमानी खालून शेळ□ी नाल्यापर्यंत, तुळजापूर रस्त्यापासून हैद्राबाद रस्त्यावरील तिरकस पुलापर्यंत हद्द ठरविण्यात आली. सन १८६६ नंतर सन १८७१ मध्ये सोलापूर शहराच्या हद्दी निश्चित करण्यात आल्या. यावेळी शेळगी नाला, जी. आय. पी., रेल्वे, लष□र, □सबे सोलापूर, मोदीखाना, किल्ल्याच्या पश्चिमेला व दक्षिणेला असलेला परिसर सोलापूर नगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यात आला. सोलापूर शहराची पहिली हद्दवाढ सन १८७३ पासून लागू झाली. सन १९१३ मध्ये सोलापूर शहराचे क्षेत्रफळ ४१६० एकर होते. सन १९२७ मध्ये शेळगी जवळील ३२७ एकर जमीन त्यात समाविष्ट झाली. पुढील काळात शहराची हद्दवाढ वाढत जाऊन सन १९५३ अखेर शहराचे क्षेत्रफळ ५५०२ एकर इतके झाले.[३४] सन १९७९ ते १९९२ या काळात तीन वेळा शहराची हद्दवाढ झाल्याचे दिसून येते.

सोलापूर शहरातील कापड गिरण्यातून काम करणाऱ्या कामगारांची संख्या वाढल्याने हे कामगारांचे शहर म्ह□ून ओळखले जाऊ लागले. शहरातील या गिरण्यांमध्ये काम करण्यासाठी महाराष्ट्राबरोबरचा कर्नाटक व आंध्रप्रदेशातून कामगार वर्ग मोठ्या प्रमाणावर सोलापूर शहरात येऊन स्थायिक झाला. त्यामुळे शहरात मराठी - □ानडी - तेलगु या भाषा बोलणारांची संख्या वाढली. कापड गिरण्या सुरू झाल्याने सोलापूर शहराच्या आर्थिक व औद्योगिक विकासाबरोबर सांस्कृतिक विकास होण्यास या गिरण्यांतून काम करण्यासाठी विविध प्रांतातून विविध जाती-धर्मांचे लोक येथे येऊन स्थायिक झाले. त्यामुळे हे शहर बहुभाषिक, बहुधार्मिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचे म्हणून ओळखले जाऊ लागले. सोलापूर शहराच्या धार्मिक व सांस्कृतीक इतिहासात भाषा व संस्कृतीने महत्वाचे योगदान दिले आहे.

संदर्भ व तळटिपा

१. □झिटीयर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, सोलापूर डिस्ट्रिक्ट, १९७७, पृ. १, २.
२. Revenue Department , File Vol. III, १८७६, पृ. ३. (B. A.) **दुर्गादेवीचा दुष्काळ -** सन १३९६ पासून सन १४०७ पर्यंत दक्□िण भारतात फार मोठा दुष□ाळ पडला होता. या दुष्काळात कित्येक प्रदेश ओस पडले व हजारो लोक, जनावरे मृत्यूमुखी पडली. या दुष्काळास 'दुर्गादेवीचा दुष्काळ' म्हणून ओळखले जाते.
३. Revenue Department, File Vol. III, १८९६, पृ. ३. (B. A.)
४. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझिटीयर, १९७७, पृ. ७-९.
५. □झिटीयर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर डिस्ट्रिक्ट, १८८४, खंड २०, पृ. ४८४, ४८५.
   १. जक□ल वि. न., उपरोक्त, पृ. १-३.
   २. सोलापूर समाचार ज्युबिली अं□, १९३६, पृ. ९०
६. सेन्सेस ऑफ इंडिया, डिस्ट्रिक्ट सेन्सेस हँडबुक, सोलापूर, १९६१, पृ. ४९.
७. □त्ता. **फुटाणे □िर□ी -** १८९६ मध्ये लक्ष्मी कॉटन मॅन्यूफॅक्चरींग कंपनीच्या कापड गिरणीचे बांधकाम सुरू झाले त्यावेळी शहरात प्लेगच्या साथीने व दुष्काळाने थैमान घातले होते. त्यामुळे बांधकाम करणाऱ्या मजूरांना मजूरीचे पैसे देण्याऐवजी खाण्यासाठी फुटाणे दिले जात असत. यामुळेच या गिरणीला फुटाणे गिरणी या नावानेही ओळखले जाई.
८. □त्ता.
९. □त्ता, पृ. ५०.
१०. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझिटीयर, १९७७, पृ. २१६.
११. दैनि□ दिव्य मराठी, सोलापूर, २८ ऑगस्ट २०१२.

१२. कित्ता, ४ ऑगस्ट २०१३.
१३. लिगाडे जयदेवीताई, श्रीसिध्दरामाची त्रिवीधी, कन्नडकोटी प्रकाशन सोलापूर, १९५८, प्रस्तावना पृ ४.
१४. जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. २६, २७.
१५. मो□लेवार सुधा□र, विरशैवकोष खंड- १, अ. भा. वी. सा. मं. नागपूर, २००१, पृ. ५४.
१६. संशोध□, जून २००४, पृ. २१, आनंद कुंभार यांच्या लेखावरून.
१७. जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. ४१.
१८. महाराष्ट्र राज्य □झिटियर इतिहास : प्राचीन काळ, □ड- १, महाराष्ट्र शासन मुंबई, २०१०,पृ. ६६१.
१९. □लकर्णी ग. प., (संपा.), शतसांवत्सरिक ग्रंथ, सोलापूर, १९५३, पृ. ६
२०. संशोध□ (त्रैमासिक), मार्च २००६, पृ. १६.
२१. □झिटीयर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, १८८४, खंड २०, पृ. ४८५.
२२. महाराष्ट्र राज्य □झिटियर इतिहास : प्राचीन काळ, खंड- १, पृ. ६९३, ६९४.
२३. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझिटीयर , १९७७, पृ. १.
२४. सोलापूर समाचार, १ नोव्हेंबर १९७४, ३० ऑक्टोबर १९७४.
२५. □झिटीयर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, १८८४, खंड २०, पृ. ४८४, ४८५.
२६. मो□लेवार सुधाकर, उपरोक्त, पृ. ५४.
२७. □झिटीयर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, १८८४, खंड २०, पृ. ४८८.
२८. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझिटीयर, १९७७, पृ. ९६८.
२९. □लकर्णी ग. प., उपरोक्त, पृ. ३६ ते ५१.
३०. सोलापूर समाचार ज्यूबिली अंक, पृ. १६२.
३१. □लकर्णी ग. प., उपरोक्त, पृ. १३५.
३२. Government Dept. Vol. XXV १८६०, पृ. ९. (B. A.)
३३. Bombay Municipal Act.१८७३, पृ. १४.
३४. सोलापूर महान□रपालि□ा स्मर्रा□□ा, महापौर सुव□ चषक स्पर्धा १९९६,
३५. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझिटीयर , १९७७, पृ. २१५ - २२२.
३६. दैनि□ स□ाळ सोलापूर, ३१ मे २०१४.